भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ मध्ये राबविण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रू.८४.४९७ लक्ष निधी अर्थसंकल्पिय वितरणप्रणालीवर उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्र. फुंफला-२०१८/प्र.क्र.२३७/९-अे,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :१२ मार्च, २०१९

संदर्भ:- १. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. राफयो-२०१८/प्र.क्र. ४७/९-अे, दि. ०६/०७/२०१८
२.वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२/०४/२०१८ व दि.२५/०१/२०१९
३.कृषि विभाग अर्थसंकल्प कक्ष पत्र क्र.पूरक-२०१८/प्र.क्र.१०९/१८/२-अे, दि.०६/१२/२०१८
४.कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. राफयो-२०१८/प्र.क्र.४७(भाग-४)/९-अे, दि.२८/१२/२०१८
५.संचालक फलोत्पादन, यांचे जा.क्र.कृआ/फलो-२/भा.फुं.फ.योजना/२६५/२०१९, दि.१६/०२/२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरिता पात्र ठरु शकत नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सुरू केली आहे. सदर योजना सन २०१८-१९ मध्ये राबविण्यास संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक ०६/०७/२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

शासन निर्णय:-

१. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या अंमलबजावणीकरिता अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रू.८४.४९७० लक्ष (रूपये चौऱ्याऐंशी लाख एकोणपन्नास हजार सातशे फक्त) निधी आयुक्त कृषि यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशीर्षांतर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.
मागणी क्र. डी-३
२४०१- पिक संवर्धन
(००)
७८९अनुसूचित जाती घटक योजना
(००)(३३)
भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना -अनुसूचित जाती घटक कार्यक्रम
(२४०१ A९०४)
३३ अर्थसहाय्य

३. सदर योजना राबविताना यापूर्वी निर्गमित शासन निर्णयातील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतुदींतून फक्त अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील लाभार्थ्यांनाच लाभ देण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

५. निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तीकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ व २५ जानेवारी, २०१९ मधील अटी व शर्तीचे अनुपालन करण्याच्या अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.१७५/१८/विघयो, दि.११/०१/२०१९ अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७०/२०१९/ व्यय-१, दि.०६/०३/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१२१४५६३५३७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.03.12 15:00:13 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा, महाराष्ट्र राज्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.-३२
८. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.-३२
९. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
१०. आयुक्त (कृषी), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
११. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. सर्व विभागीय कृषि सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१५. सहाय्यक संचालक (लेखा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
१७. संचालक लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई (२ प्रती)
१८. सहसंचालक लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई -३२
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२१. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
२२. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२३. निवड नस्ती/९-अे